# मंत्रिमंडळ निर्णय

## ७ सप्टेंबर २०१५

## ( मंत्रिमंडळ बैठक क्र. ४६ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | परभणी, अहमदनगर, सोलापूर जिल्ह्यात चारा छावण्या सुरू करण्याचा निर्णय | मदत व पुनर्वसन |
| २ | मुंबईसह नगरपरिषदांसाठी अधिनियमात सुधारणा<br>एमआयडीसीची परवानगी घेतलेल्या उद्योगांना पालिकांच्या परवानगीची आवश्यकता नाही | नगर विकास |

इतर

पाऊस/पिक-पाणी

१. राज्यात सरासरीच्या ५५ टक्के पाऊस, ४९ टक्के पाणीसाठा

## परभणी, अहमदनगर, सोलापूर जिल्ह्यात चारा छावण्या सुरू करण्याचा निर्णय

राज्यात पावसाने ओढ दिल्यामुळे निर्माण झालेल्या चारा टंचाईच्या परिस्थितीत पशूधन वाचविण्यासाठी परभणी, अहमदनगर, सोलापूर जिल्ह्यात चारा छावण्या सुरू करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

राज्यातील बीड, उस्मानाबाद आणि लातूर जिल्ह्यात तालुकास्तरावर चारा छावण्या सुरू करण्यात आल्या आहेत. याच धर्तीवर आता परभणी, अहमदनगर, सोलापूर या जिल्ह्यातील पशूपालकांना जनावरांच्या चाऱ्यासाठी रोख रक्कम देण्याऐवजी त्याठिकाणी चारा छावण्या सुरू करण्यात येणार आहेत.

या निर्णयामुळे अहमदनगर जिल्ह्याच्या दक्षिण भागातील जामखेड, कर्जत, पारनेर, पाथर्डी, अहमदनगर, शेवगाव, श्रीगोंदा, तसेच परभणी जिल्ह्यातील परभणी, गंगाखेड, पाथरी, जिंतूर, पूर्णा, पालम, सेलु, सोनपठ आणि मानवत या तालुक्यांमध्ये तालुकास्तरावर चारा छावण्या सुरू करण्यात येतील.

अहमदनगर जिल्ह्यातील अन्य तालुक्यांमध्ये यावर्षी अपुऱ्या प्रमाणात पाऊस होऊन चाऱ्याची निकड भासल्यास चारा छावणी उघडण्याची मागणी किंवा शिफारस जिल्हाधिकारी यांनी विभागीय आयुक्त यांच्यामार्फत केल्यास त्याठिकाणी चाराछावणी उघडण्यात येणार आहे. या दोन जिल्ह्यांसोबत सोलापूर जिल्ह्यात चारा छावण्या सुरू करण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील छावण्यांची ठिकाणे प्रशासनाच्या अहवालानंतर निश्चित करण्यात येतील.

-----o-----

मुंबईसह नगरपरिषदांसाठी अधिनियमात सुधारणा

**एमआयडीसीची परवानगी घेतलेल्या उद्योगांना**
**पालिकांच्या परवानगीची आवश्यकता नाही**

मुंबई महापालिकेसह राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायती क्षेत्रातील औद्योगिक विकास क्षेत्रातील ज्या उद्योगांनी आपल्या उभारणीसाठी संबंधित महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) अगोदरच परवानगी घेतलेली आहे, अशा उद्योगांना संबंधित महापालिका, नगर परिषद, नगर पंचायतीची पुन्हा परवानगी घेण्याची अट रद्द करण्यासाठी याबाबतच्या अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

एमआयडीसीची परवानगी घेतलेल्या उद्योगांनाही मुंबई महापालिका अधिनियमातील कलम ३९० व ३९३ मधील तरतुदीनुसार महापालिकेचीही परवानगी घेणे आवश्यक होते. आजच्या निर्णयामुळे त्याची आवश्यकता राहणार नाही. त्यादृष्टीने मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९० (१) व ३९३ (१८) मध्ये तसेच महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ च्या कलम २७८ मध्ये, पोटकलम (३) मध्ये आणि परिच्छेद पाचमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय झाला आहे.

मेक इन इंडिया कार्यक्रमाच्या अनुषंगाने राज्यातही मेक इन महाराष्ट्र हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने राज्यात गुंतवणूक वाढून औद्योगिक विकासाला चालना मिळावी यासाठी इझ ऑफ डुईंग बिझनेस धोरण अवलंबिण्यात आले आहे. उद्योजकांना व्यवसाय सुरु करणे सुलभ व्हावे, या दृष्टीने परवानग्यांची संख्या कमी करण्यात आली आहे. या धोरणाच्या अनुषंगाने एका सक्षम प्राधिकरणाकडून परवागनी घेतलेली असल्यास त्यास पुन्हा दुसऱ्या प्राधिकरणाची परवानगी घ्यावी, लागू नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम ३१३ मध्ये सुधारणा करून महानगरपालिका क्षेत्रातील ज्या उद्योगांनी एमआयडीसीची परवानगी घेतली असेल तर त्यांना महापालिकेची परवानगी घेण्यातून सूट देण्यात आली होती. याच धर्तीवर मुंबईसह नगरपरिषद व नगरपंचायतींच्या क्षेत्रातही कारखाना स्थापन करणाऱ्या आस्थापनांना पुन्हा परवानगीची आवश्यकता राहणार नाही.

-----०-----

कृषी/मदत व पुनर्वसन

## राज्यात सरासरीच्या ५५ टक्के पाऊस, ४९ टक्के पाणीसाठा

गेल्या काही दिवसात राज्यात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच काही ठिकाणी हलल्या स्वरुपाचा पाऊस पडला. राज्यात आजपर्यंत ५३८.७ मि.मी. पाऊस झाला असून तो ९७६.४ मि.मी. या सरासरीच्या ५५.२ टक्के आहे. राज्यातील सर्व जलप्रकल्पांत ४९ टक्के एवढा साठा आहे.

राज्यात सरासरीच्या तुलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार जिल्ह्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणे- अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर,भंडारा,गोंदिया या सहा जिल्ह्यांत ७६ ते १०० टक्के पाऊस झाला आहे. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नंदूरबार, जळगाव, पुणे, सातारा, सांगली, औरंगाबाद, जालना, हिंगोली, बुलढाणा, वाशिम, चंद्रपूर, गडचिरोली या १८ जिल्ह्यांमध्ये ५१ ते ७५ टक्के पावसाची नोंद झाली असून नाशिक, अहमदनगर, सोलापूर, कोल्हापूर, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, यवतमाळ या दहा जिल्ह्यांत २६ ते ५० टक्के पाऊस पडला आहे.

राज्यातील ३५५ तालुक्यांपैकी सहा तालुक्यात सरासरीच्या तुलनेत ० ते २५ टक्के, ११९ तालुक्यात २६ ते ५० टक्के, १४३ तालुक्यात ५१ ते ७५ टक्के, ६८तालुक्यात ७६ ते १०० टक्के आणि १९ तालुक्यात १०० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस झाला आहे.

### राज्यात ९७ टक्के क्षेत्रावर पेरणी

राज्यातील खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र १३४.७० लाख हेक्टर असून ४ सप्टेंबर अखेर १३०.६३ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राच्या तुलनेत ९७ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे.

भात पीक फुटवे फुटणे ते पोटरीच्या अवस्थेत आहे. खरीप ज्वारी पीक पोटरी ते फुलोरा अवस्थेत, बाजरी पीक दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत, मका पीक वाढीच्या ते फुलोरा अवस्थेत आहे. तूर पीक वाढीच्या अवस्थेत, उडिद व मुग पिके शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. कापूस पीक पाते, फुले व बोंडे लागण्याच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पीक फुलोरा, शेंगा धरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. राज्यातील बहुतांश भागात कमी पर्जन्यमानामुळे पिकांची वाढ खुटलेली असून पिकांच्या पुढील वाढीसाठी पुरेशा पावसाची नितांत आवश्यकता आहे.

### धरणात ४९ टक्के पाणी साठा

राज्यातील सर्व जलप्रकल्पांत ४९ टक्के साठा असून गेल्या वर्षी याच सुमारास ७२ टक्के साठा होता. प्रकल्पातील विभागनिहाय आजचा आणि कंसात गतवर्षी याच दिवशीचा साठा पुढीलप्रमाणे-

मराठवाडा - ८ टक्के (३४), कोकण - ८६ टक्के (९३), नागपूर - ७५ टक्के (७१), अमरावती - ६१ टक्के (६४), नाशिक - ४३ टक्के (६८) आणि पुणे - ५० टक्के (८९), इतर धरणे - ७१ टक्के (९७) असा पाणीसाठा आहे.

### राज्यात २१३० टँकर्सद्वारा पाणी पुरवठा

राज्यातील १६३८ गावे आणि ३०८२ वाड्यांना आजमितीस २१३० टँकर्सद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. मागील वर्षी याच सुमारास ४८ टँकर्सद्वारे पुरवठा करण्यात येत होता.

### रोहयोच्या कामावर ९२ हजार मजूर

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यात २९ ऑगस्टपर्यंत १२ हजार ८५९ कामे सुरू असून या कामांवर ९१ हजार ९९९ मजुरांची उपस्थिती आहे. राज्यात ४ लाख २६ हजार ३०८ कामे शेल्फवर असून त्या कामांची मजूर क्षमता १२९१.१९ लाख एवढी आहे.

-----०-----